| MHRG060012062022 | **दिवाणी चौकशी अर्ज नं.१६७/२०२२ मधील**<br>**निशाणी क्र.१ वरील आदेश.** |
| --- | --- |

**१.** अर्जदार क्र. १ ते ३ यांनी सदरचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टच्या तरतुदीनुसार हेअरशिप सर्टीफिकेट मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**२.** अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील कै. मच्छींद्र नारायण माने हे दि. ०१/०९/२०२२ रोजी मयत झाले आहेत. सबब, अर्जदार क्र. १ ते ३ हे कै. मच्छींद्र नारायण माने यांचे कायदेशीर वारस आहेत. तसा दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

**३.** या अर्जाच्या कामी नोटीस काढण्यात आली. सदरची नोटीस स्थानिक वृत्तपत्र रायगड वृत्तवेधमध्ये दि.०२/१२/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली. ती **नि.क्र.१८** कडे दाखल आहे. दि.०२/१२/२०२२ पासून आजपर्यंत या अर्जाला कोणीही हरकत उपस्थित केलेली नाही.

**४.** या अर्जाच्या कामी कै. मच्छींद्र नारायण माने यांच्या मृत्यूच्या दाखल्याची मुळ प्रत **नि.क्र. १२** कडे दाखल केलेली आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या आधार कार्डची साक्षांकीत प्रत **नि.क्र. १३** ते **१५** कडे, अर्जदार क्र. १ ते ३ यांनी रेशनकार्डची साक्षांकीत प्रत **नि.क्र. १६** कडे दाखल केली आहे. अर्जदार क्र. १ ते ३ तर्फे पुरावा संपल्याची पुरशीस **नि.क्र.२०** कडे दाखल केली आहे.

**५.** अर्जदार क्र. ४ यांनी या अर्जाच्या कामी **नि.क्र.११** वर आपला पुरावा नोंदविलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांनी सादर केलेल्या पुराव्यावरुन कै. मच्छींद्र नारायण माने यांना अर्जदार क्र. १ ते ३ हे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येत

आहे. त्यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही वारस असल्याचे दिसून येत नाही. अर्जदार क्र. १ ते ३ यांना वारस प्रमाणपत्र देण्यास कोणतीही कायदेशीर बाधा नाही. सबब, अर्जदार क्र. १ ते ३ हे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्जदार क्र. १ ते ३ यांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र. १. माधवी मच्छींद्र माने, २. स्वप्नील मच्छींद्र माने व ३. श्रध्दा प्रणव कुंभार, पुर्वाश्रमीची श्रध्दा मच्छींद्र माने हे कै. मच्छींद्र नारायण माने यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ३ यांना योग्य मुद्रांक भरल्यानंतर हेअरशीप सर्टीफिकेट अदा करण्यात यावे.

Note below heirship certificate as per Para 312 of Civil Manual:

" The person, to whom this certificate is granted, or his representative, is required, within six months from the date of this certificate, or within such further time as the Court may from time to time appoint, to exhibit in Court a full and true inventory of all the property and credits in his possession under this certificate, and also, within one year from the same date or within such further time as the Court may from time to time appoint, to render to the Court a true account of the said property and credits, showing the assets which have come to his hands and the manner in which they have been applied or disposed of."

Digitally signed by DESHPANDE PRITESH CHANDRASHEKHAR
Date: 2023.01.06 12:42:38 +0530

पेण. ( प्रितेश देशपांडे )
दिः ०५.०१.२०२३. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पेण.